e-Office File No. नपप्रस-११०२१/४/२०२३-eGov

महाराष्ट्र शासन

नगरविकास विभाग

**नगर परिषद प्रशासन संचालनालय**

सातवा मजला, बेलापुर भवन, सेक्टर ११, सी बी डी बेलापुर, नवी मुंबई - ४०० ६१४

desk7.dma@maharashtra.gov.in (०२२) २७५६०१४५ www.mahadma.maharashtra.gov.in

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत विविध लोकसेवा अधिसूचित करणेबाबत**

**परिपत्रक क्र. नपप्रसं/ का-०८/ई-गव्हर्नंस/ DUTD /२०२४/३०१**
**दिनांक: १५-०१-२०२४**

**वाचा -** १. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५
२. शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१५/प्र.क्र.१८९/नवि-१४ दि. २३-०६-२०१५
३. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३९८/नवि-२० दि. ०४-०९-२०१७
४. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३९८/नवि-२० दि. २६-०८-२०१९
५. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१/प्र.क्र.१८०/नवि-२० दि. २९-०१-२०२१
६. शासन निर्णय क्र. संकीर्ण-०९२२/प्र.क्र.३२/नवि-३२ दिनांक ३०-०९-२०२२
७. शासन निर्णय क्र. संकीर्ण-०९२२/प्र.क्र.३२/नवि-३२ दिनांक १५-१२-२०२२
८. शासन निर्णय क्र. संकीर्ण-०९२२/प्र.क्र.३२/नवि-३२ दिनांक ०९-०१-२०२४

शासनातर्फे दिनांक २८-०४-२०१४ पासुन राज्यात पात्र नागरीकांना विहित कालमर्यादेत लोकसेवा मिळाव्यात, या उद्देशाने संदर्भ क्र. १ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ लागु करण्यात आलेला आहे. तसेच नगरविकास विभाग-२ यांचेद्वारे सन २०२२-२३ पावेतो संदर्भ क्र. २ ते ७ येथील विविध शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती यांना महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ चे कलम ३ अन्वये विविध ६१ नागरी लोकसेवा अधिसूचित करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यापैकी ४ सेवा ह्या सामाईक असल्याने प्रत्यक्ष लोकसेवांची संख्या ही ५७ एवढी येते.(यादी संलग्न)

२. तसेच दिनांक ०९-०१-२०२४ चे संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती यांना महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ चे कलम ३ अन्वये विविध १० नागरी लोकसेवा अधिसूचित करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

३. त्या अनुषंगाने सर्व महानगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायत यांनी सदर सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित करुन घ्याव्यात. तसेच सदर सेवा ह्या अगोदरच ऑनलाइन केल्या गेलेल्या नसतील, तर त्या ऑनलाइन विकसित करुन घ्याव्यात व त्यांचे "आपले सरकार" पोर्टल सोबत API Integration करुन घ्यावे.

सोबत - संदर्भांकीत शासन निर्णयाची प्रत

मा. आयुक्त तथा संचालक यांचे मान्यतेने,

SHANKAR BABAN GORE
Digitally signed by SHANKAR BABAN GORE
Date: 2024.01.15 18:06:51 +05'30'

**(शंकर गोरे)**
**उप आयुक्त**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**

**प्रति,**

१. मा. आयुक्त, महानगरपालिका (सर्व).

२. मुख्याधिकारी, नगरपरिषद व नगरपंचायत (सर्व).

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१. मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग-२, मंत्रालय, मुंबई.

२. मा. राज्य मुख्य लोकसेवा हक्क आयुक्त, महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग, मुंबई.

३. मा. राज्य लोकसेवा हक्क आयुक्त, सर्व महसुली विभाग.

**प्रत उचित कार्यवाहीस्तव सविनय सादर.**

१. मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित(महाआयटी), चर्चगेट, मुंबई.

**नगरविकास विभाग-२ यांचेद्वारे राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरीता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांची यादी**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत राज्यातील खालील लोकसेवा ह्या राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा आणि नगरपंचायती यांनी अधिसूचित करणे बाबत नगरविकास विभाग-२ यांच्यामार्फत शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांची संख्या | अधिसूचित करण्यात आलेल्या सेवेचे नाव | संबंधित शासन निर्णय |
|---|---|---|---|
| १. | १५ | १. जन्म प्रमाणपत्र देणे<br>२. मृत्यु प्रमाणपत्र देणे<br>३. विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे<br>***४. मालमत्ता कर उतारा देणे***<br>***५. थकबाकी नसल्याचा दाखला देणे***<br>***६. अ) दस्तऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे***<br>***ब) वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे***<br>७. झोन दाखला देणे<br>८. भाग नकाशा देणे<br>९. बांधकाम परवाना देणे<br>१०. जोते प्रमाणपत्र देणे<br>११. भोगवटा प्रमाणपत्र देणे<br>***१२. नळजोडणी देणे***<br>१३. जलनिसारण जोडणी देणे<br>१४. अग्निशमन नाहरकत दाखला देणे(महानगरपालिकेकरीता)<br>१५. अग्निशमन अंतिम नाहरकत दाखला देणे(महानगरपालिकेकरीता) | शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१५/प्र.क्र १८९/नवि-१४ दिनांक २३-०६-२०१५ |
| २. | ३८<br>(पैकी ४ सेवा ह्या येथील अ क्र. १ चे शासननिर्णयामधे देखील समाविष्ट आहेत त्यामुळे एकुण सेवा संख्या = ३४) | १. नव्याने कर आकारणी<br>२ पुनः कर आकारणी<br>३ कराची मागणीपत्र तयार करणे<br>४. करमाफी मिळणे<br>***५. थकबाकी नसल्याचा दाखला देणे(सेवा अ.क्र. १ येथील शासन निर्णयात देखील समाविष्ट)***<br>***६. मालमत्ता कर उतारा देणे(सेवा अ.क्र. १ येथील शासन निर्णयात देखील समाविष्ट)***<br>७. रहिवास नसलेल्या मालमत्तांना करात सुट मिळणे<br>***८. मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे(सेवा अ.क्र. १ येथील शासन निर्णयात देखील समाविष्ट)***<br>९. स्वयंमुल्यांकन<br>१०. आक्षेप नोंदविणे<br>११. उप विभागामध्ये मालमत्ता विभाजन<br>१२. मालमता पाडणे व पुनःबांधणी आकारणी<br>***१३. नविन नळजोडणी((सेवा अ.क्र. १ येथील शासन निर्णयात देखील समाविष्ट)*** | शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र. ३९८/नवि-२० दिनांक ०४-०९-२०१७<br>व<br>शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र. ३९८/नवि-२० दिनांक २६-०८-२०१९ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | १४. मालकी हक्कात बदल करणे<br>१५. नळजोडणी आकारामध्ये बदल करणे<br>१६. तात्पुरते/कायमस्वरुपी नळजोडणी खंडीत करणे<br>१७. पुनजोडणी करणे<br>१८. वापरामधे बदल करणे<br>१९. पाणीदेयक तयार करणे<br>२०. प्लंबर परवाना<br>२१. प्लंबर परवाना नुतणीकरण करणे<br>२२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>२३. नादुरुस्त मीटर तक्रार करणे<br>२४. अनधिकृत नळ जोडणी तक्रार करणे<br>२५. पाण्याची दबाव क्षमता तक्रार<br>२६. पाण्याची गुणवत्ता तक्रार<br>२७. व्यापार व्यवसाय साठा करणेसाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळणे<br>२८. मंडपासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे<br>२९. नवीन परवाना मिळणे<br>३०. परवान्याचे नुतणीकरण<br>३१. परवाना हस्तांतरण<br>३२. परवाना दुय्यम प्रत<br>३३. व्यवसायाचे नाव बदलणे<br>३४. व्यवसाय बदलणे<br>३५. परवाना/भागीदाराचे नाव बदलणे<br>३६. भागीदारांच्या संख्येत बदल(वाढ/कमी)<br>३७. परवाना रद्द करणे<br>३८. कालबाह्य परवानासाठी नुतणीकरण सुचना | |
| ३. | ३ | १. नवीन जाहिरात/आकाशचिन्ह परवाना व परवाना नुतनीकरण<br>२. नवीन सिनेमा चित्रीकरण परवाना व परवाना नुतनीकरण<br>३. व्यवसाय परवाना स्वयंनुतनीकरण | शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र. १८०/नवि-२० दिनांक २९-०१-२०२१ |
| ४. | १ | १. मोबाईल टावर परवाना | शासन निर्णय क्र. संकीर्ण-०९२२/प्र.क्र.३२/नवि-३२ दिनांक ३०-०९-२०२२ |
| ५. | ४ | १. रस्ता खोदाई परवाना देणे<br>२. राज्य खाद्य परवान्याकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा नाहरकत दाखला<br>३. खाद्य नोंदणी प्रमाणपत्राकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा आरोग्यविषयक नाहरकत दाखला<br>४. पाणी अनुपलब्धता प्रमाणपत्र देणे | शासन निर्णय क्र. संकीर्ण-०९२२/प्र.क्र.३२/नवि-३२ दिनांक १५-१२-२०२२ |
| ५ | १० | १. महाराष्ट्र शुश्रृषा-गृह नोंदणी अधिनियम, १९४९ अंतर्गत शुश्रृषा-गृह परवाना देणे. (महानगरपालिकेकरीता)<br>२. महाराष्ट्र शुश्रृषा-गृह नोंदणी अधिनियम, १९४९ अंतर्गत शुश्रृषा-गृह परवान्याचे नुतनीकरण करणे. (महानगरपालिकेकरीता)<br>३. महाराष्ट्र शुश्रृषा-गृह नोंदणी अधिनियम, १९४९ अंतर्गत परवान्यावर परवानाधारक/भागीदाराचे नाव बदलणे. (महानगरपालिकेकरीता)<br>४. लॉजिंग हाउस परवाना देणे. | शासन निर्णय क्र. संकीर्ण-०९२२/प्र.क्र.३२/नवि-३२ दिनांक ०९-०१-२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ५. लॉजिंग हाउस परवान्याचे नुतनीकरण करणे.<br>६. मंगल कार्यालय / सभागृह वगैरे परवाना देणे.<br>७. मंगल कार्यालय / सभागृह वगैरे परवान्याचे नुतनीकरण करणे.<br>८. फेरीवाले नोंदणी प्रमाणपत्र देणे.<br>९. भूमीगत दूरसंचार वाहिनी (ऑप्टीकल फायबर केबल) टाकण्याकरीता परवानगी देणे.<br>१०. महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम, १९७५ मधील कलम ८ मधील तरतुदींनुसार वृक्ष तोड परवानगी देणे. | |
| | **Total number of notified services = ७१ एकुण अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांची संख्या = ७१**<br>उक्त पैकी ४ सेवा ह्या दिनांक २३-०६-२०१५ आणि दिनांक ०४-०९-२०१७ मधे सामाईक आहेत.<br>**याकारणाने प्रत्यक्ष लोकसेवांची संख्या ही ६७ एवढी येते.** | | |